FORM-I A

N.C.R.B.

I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि., पहिली खबर क्र. FIR No.: ११/२०१९, वर्ष Year: २०१९, दिनांक Date: १३/०२/२०१९

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारित २०१८), कलमे Sections: ७
   (ii) अधिनियम Act ............, कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day: सोमवार, तारीख पासून Date from: ११/०२/२०१९, वेळ Time: –, तारीखे पर्यंत Date to: –, वेळ Time: –

   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)

   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date: १२/०२/२०१९, वेळ Time: १५:०० वा

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: २५ / २०१९, तारीख Date: १३/०२/२०१९, वेळ Time: १३०५ वा

4. माहितीचा प्रकार Type of Information: प्रत्यक्ष, लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S.: –, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No.: –

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name, ठिकाणाचे नंबर No. if any, गल्ली Ward, रस्त्याचे नाव Name of road: देवनार पोलिस ठाणे बा.तु. पाटील मार्ग, गोवंडी, मुंबई-४०० ०४३

   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place ............, गाव Village ............, पोस्ट Post ............, तालुका Taluka ............, जिल्हा Distt. ............, राज्य State ............

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ............, तालुका Taluka ............, जिल्हा Distt. ............, राज्य State ............

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

   (a) नाव Name: धनाजी धायगुडे (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name: साधू धायगुडे

   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age: १/३/१९९०, २८ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: ८८९८८८८५८९

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ............ दिल्याचा दिनांक Date of Issue ............ दिल्याचे ठिकाण Place of Issue ............ (f) व्यवसाय Occupation ............

   (g) धर्म Religion: हिंदू, जात Caste: धनगर, जनजात Sub-Caste: –

   (h) पत्ता : Address : गल्ली / सर्वे नं. Ward, घर / नाव नंबर House/Name No., फोन /मो. नंबर Phone/M. No., पॅन नं. Pan No., वोटर्स नं. Card No., रस्त्याचे नाव Road, जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place, गाव Village, पोस्ट Post, पो. स्टे. P. Stn.: १शिवशक्ती सेवा संघ, न्यू गौतमनगर, प्लॉट नं. ४, गोवंडी, मुंबई-४०० ०४३

   तालुका Taluka ............ जिल्हा Distt. ............ राज्य State ............ सध्याचा पत्ता Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   दत्तात्रय गोविंद चौधरी, वय-५० वर्षे, पोलिस निरिक्षक, देवनार पोलिस ठाणे, मुंबई
   रा.ठी. १/डी/४०३, चुनाभट्टी पोलिस ठाणेच्या वर, चुनाभट्टी, मुंबई

क

यातील फिर्यादी नामे धनाजी साधू घायगुडे, वय-२८ वर्षे, यांचा स्वतंत्र पानावर घेतलेला संगणकीय जबाब हेच प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष,

(संजीव पाटील)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

जबाब दिनांक – १३/०२/२०१९

श्री. धनाजी साधू धायगुडे, वय – २८ वर्षे, धंदा – शिक्षक, (खाजगी शिकवणी), रा.ठि. शिवशक्ती सेवा संघ, न्यू गौतम नगर, पार्ट नं. ०४, गोवंडी, मुंबई – ४०० ०४३. मो.क्र. ८८९८८८८५८६.

—— ० ——

मी वरील प्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर मी माझे जन्मापासून राहावयास आहे. माझे कुटुंबात माझे आई, वडिल, भाऊ नामे शंकर, वय ३१ वर्षे, वहिनी नामे सुरेखा, त्यांच्या दोन मुली व एक मुलगा, भाचा नामे अजीत वाघमोडे असे आहेत. माझा भाऊ नामे शंकर धायगुडे हा नेव्ही येथे नोकरीस असून, मी आमचे राहते घराच्या पोटमाळयावर सन २०१८ पर्यंत खाजगी शिकवणी घेत होतो. सद्या मी खाजगी शिकवणी घेणे बंद केले आहे.

मी रहात असलेल्या परिसरात स्वप्नाली शिवाजी यमगर हि मुलगी रहात असून ती माझे खाजगी शिकवणीमध्ये इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंत शिकावयास होती. माझे तिच्याशी गेल्या ०१ वर्षापासून प्रेमसंबंध आहेत. माझे व स्वप्नाली यमगर हिंच्या प्रेमसंबंधास स्वप्नाली हिच्या कुटूंबियांचा विरोध होता. स्वप्नाली सज्ञान झाल्यानंतर मी व स्वप्नालीने एकमेकांच्या संमतीने दि. ०१/११/२०१८ रोजी मा. न्यायालय, बांद्रा येथे रजिस्टर पध्दतीने विवाह केला आहे. आमचे लग्नाचे वेळी माझा भाऊ नामे शंकर व माझे मित्र हजर होते.

मी व स्वप्नाली एकाच समाजातील असल्याने आम्ही रजिस्टर पध्दतीने लग्न केल्यानंतर दोघांनी रितसर लग्नाची मागणी घालून दोन्ही कुटुंबियांच्या संमतीने समाजासमोर लग्न करु असे ठरविले होते. रजिस्टर पध्दतीने लग्न झाल्यानंतर आम्ही दोघेही आपआपल्या घरी राहत होतो.

दरम्यान मी व स्वप्नाली यांनी मा. न्यायालयात लग्न केल्याची बातमी स्वप्नाली हिच्या कुटुंबियांना दि. २६/१२/२०१८ रोजी समजली. त्यावेळी स्वप्नाली हिच्यावर तिच्या आई वडिलांनी दबाव आणून मी, माझा भाउ शंकर व मित्र अमर इंगळे व विकास थोरात असे सर्वानी तिला फुस लावून तिच्या इच्छेविरुध्द लग्न करण्याच्या इराद्याने पळवून नेल्याबाबत, तसेच स्वप्नाली व तिच्या कुटुंबियांना धमकी दिल्याबाबत दि. २८/०१/२०१९ रोजी स्वप्नाली हिने केलेल्या तक्रारीवरुन देवनार पोलीस ठाणे येथे आमचेविरुध्द गु.र.क्र. ३०/२०१९ कलम ३६६, ५०४, ३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा हा पो.उ.नि. हंडाळ यांनी नोंद केला आहे. त्यावेळी देवनार पोलीस ठाणे येथे पो.उ.नि. हंडाळ यांनी मला बोलावून घेतले व सदरवेळी आमचेविरुध्द स्वप्नाली हिने दिलेल्या तक्रारीवरुन गुन्हा नोंद केल्याची माहिती मला मिळाली.

आम्हाला सदर गुन्हयात अटक होईल अशी भिती वाटल्याने आम्ही माझे वकिलांकडे जावून त्यांना सदरची माहिती दिल्यानंतर त्यांच्यामार्फतीने आम्ही मा. न्यायालय, कुर्ला येथे अटकपूर्व जामीनासाठी दि. ०१/०२/२०१९ रोजी जामीन अर्ज क्र. एबीए २००/१९ अन्वये सादर केला होता. सदर अर्जावर दि. ०२/०२/२०१९ रोजी सुनावणी होवून मा. न्यायालयानुें आम्हा सर्वांना अंतरीम जामीन मंजुर केला असून सदर जामीन अर्जावर दि. २२/०२/२०१९ रोजी अंतीम सुनावणी ठेवली आहे.

दि. १२/०२/२०१९ रोजी देवनार पोलीस ठाणेचे पो.उ.नि. कारंडे यांनी त्यांचा मोबाईल नं. ९७०२१५०१५२ यावरुन माझा मोबाईल नं. ८८९८८८८५८६ यावर दुपारी फोन करुन असे सांगितले की, " चौधरी साहेब तुला फोन करीत आहेत, तु फोन का उचलत नाही", असे म्हणून पो.उ.नि. कारंडे यांनी त्यांचा फोन चौधरी साहेबांकडे दिला. तेव्हा चौधरी साहेब यांनी मला "मी तुला तुझ्या केसमध्ये मार्गदर्शन करतो, तु पोलीस स्टेशनला ये" असे सांगितले. तेव्हा मी व माझा मित्र श्रीराम जाधव असे देवनार पोलीस ठाणे येथे गेलो व पो.नि. दत्तात्रय चौधरी यांना त्यांच्या केबीनमध्ये जावून भेटलो असता पो.नि. चौधरी साहेब यांनी मला सांगितले की, स्वप्नाली हिच्या आई वडिलांची तुला अटक होवून जेल व्हावी याकरीता ते माझेवर दबाव टाकीत आहेत. तसेच त्यांनी मला 'तुझा भाऊ शंकर हा नेव्हीमध्ये सरकारी नोकरीस असल्याने, त्यास अटक झाल्यास त्याचे नोकरीवर परिणाम होईल. तुझ्या जामीनाचा कोर्ट निर्णय आमच्या रिपोर्टवर अवलंबून आहे. सदर गुन्हा माझेकडे तपासास आहे. तुला ज़ामीनाबाबत पोलीसांकडून सहकार्य पाहिजे असेल तर रु. ३ लाख मला द्यावे लागतील."

मला देवनार पोलीस ठाणेचे पो.नि. दत्तात्रय चौधरी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. १२/०२/१९ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयात पो.नि. चौधरी यांचेविरुध्द तक्रार देण्यासाठी

आलो. त्यावेळी स.पो.आ. पाटील व स.पो.आ. चिंचकर यांनी माझी तक्रार ऐकून घेतली व मी पो.नि. चौधरी यांचेविरुध्द दिलेला लेखी तक्रार अर्ज स.पो.आ. पाटील यांचेकडे पुढील कायदेशिर कारवाईसाठी दिला.

त्यानंतर स.पो.आ. पाटील व स.पो.आ. चिंचकर यांनी दोन शासकीय पंचाना पाचारण केले. पंच, पोलीस अधिकारी व पथक यांची फिर्यादींशी ओळख करुन दिल्यांनतर दोन शासकीय पंच व पोलीस पथकासह फिर्यादी देवनार पोलीस ठाणे येथे पडताळणी करीता आले. सदरवेळी सपोआ. पाटील यांनी फिर्यादींना पडताळणी कारवाईची थोडक्यात माहिती देवून काही सूचना दिल्या. त्यानंतर फिर्यादींच्या शर्टाच्या आतील बाजुस असलेल्या बनियनला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावून फिर्यादींसोबत पंच अजिंक्य कांबळे यास त्यांचा मित्र म्हणून आवश्यक ते मार्गदर्शन करुन आलोसे दत्तात्रय चौधरी यांचेकडे पाठविले. फिर्यादी व पंच अजिंक्य कांबळे असे आलोसे चौधरी यांना त्यांच्या केबीनमध्ये जावून भेटले व त्यांच्या विरुध्द् देवनार पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्हयाबाबत चर्चा केली. त्यावेळी आलोसे चौधरी यांनी फिर्यादींना व त्यांच्या भावाला अंतीम अटक पूर्व जामीन मंजूर होण्याकरिता अनुकूल अहवाल न्यायालयास सादर करण्याच्या बदल्यात आलोसे याने फिर्यादींकडे रु. ३ लाखाची लाचेची मागणी केली. फिर्यादींना इतकी मोठी रक्कम जमा करणे शक्य नसल्याचे त्यांनी आलोसे चौधरी यास सांगितल्याने आलोसे चौधरी यांनी तडजोडीअंती रु. २,५०,०००/– स्विकारण्याचे तसेच लाचेची रक्कमेपैकी पहिला हप्ता म्हणून रु. ७० ते ८० हजार स्विकारण्याचे मान्य केले व उर्वरीत रक्कम दुस–या दिवशी देण्यास सांगितले. तसेच फिर्यादींना सदरचे पैसे एका तासात घेवून येण्यास सांगितले. त्याप्रमाणे फिर्यादी व पंच अजिंक्य कांबळे असे दोघेही लागलीच आलोसे चौधरी यांच्या केबीनमधून बाहेर पडून फिर्यादींना दिलेल्या सूचनेप्रमाणे पोलीस पथक थांबलेल्या ठिकाणी आले. तेथे सपोआ. पाटील यांनी फिर्यादींच्या शर्टाच्या आतील बनियनला लावलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला. त्यानंतर सपोआ. पाटील यांनी फिर्यादींना घडलेल्या घटनेबाबत विचारले असता त्यांना फिर्यादींनी वरील प्रमाणे संपूर्ण हकीकत सांगितली. तसेच फिर्यादींसोबत असलेले पंच अजिंक्य कांबळे यांना देखिल त्याबाबत विचारले असता त्यांनी देखिल फिर्यादींच्या हकीकती प्रमाणेच हकीकत सांगितली. त्यानंतर सपोआ. पाटील यांनी त्यांच्या ताब्यात घेतलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर हा फिर्यादी, दोन्ही पंच व पोलीस पथक यांचेसमक्ष चालू करुन त्यातील संभाषण लक्षपूर्वक ऐकले असता फिर्यादी व पंच अजिंक्य कांबळे यांनी सांगितलेली हकीकत व डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण हे मिळते–जुळते असल्याची खात्री होवून आलोसे चौधरी यांनी फिर्यादींकडे लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याची खात्री झाली.

सदरच्या पडताळणीनंतर सपोआ. पाटील यांनी मला पो.नि. चौधरी यांना दयावयाच्या लाचेची रक्कम तात्काळ घेवून येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी लागलीच माझ्या ड्रिम युगा होंडा मो/सायकल क्र. एमएच–०३–बीझेड–०२७२ यावरुन माझे रहाते घरी गेलो व घरात असलेले रु. ५०,०००/– घेवून पोलीस पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. तेथे स.पो.आ. पाटील यांना माझेकडे सध्या रु. ५०,०००/– एवढेच असल्याचे सांगितल्याने त्यांनी त्यांच्याकडे असलेल्या टॉय करन्सी मधील रु. ३०,०००/– खेळण्यातील चलनी नोटा स.पो. आ. पाटील यांनी उपलब्ध केल्या. त्यानंतर स.पो.आ. पाटील यांनी मला व पंचांना ॲन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगितले व मी दिलेल्या ख–या रु. ५०,०००/– च्या नोटा व सपोआ पाटील यांचेकडील रु. ३०,०००/– च्या खेळण्यातील चलनी नोटा असे एकूण रु. ८०,०००/– इतक्या लाचेची रक्कम तयार करुन सपोआ. पाटील यांच्या सूचनेप्रमाणे त्या सर्व नोटांना पो.शि.चालक क्र. ०७०१९०/पवार यांनी ॲन्थ्रासीन पावडर लावली व सदर रक्कमेचे बंडल हे माझे शर्टाच्या डाव्या खिशात ठेवले. पो.नि. चौधरी यांनी माझेकडे लाचेची रक्कम मागणी केल्यास माझ्या शर्टाच्या खिशात ठेवलेली रक्कम मी पो.नि. चौधरी यांना द्यावी, पो.नि. चौधरी यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांच्या केबीन बाहेर येवून ठरल्याप्रमाणे इशारा म्हणून डाव्या हाताने पॅन्टच्या डाव्या खिशातील रुमाल काढून, रुमाल तोंडावर वारंवार फिरविण्याबाबत स.पो.आ. पाटील यांनी सुचना दिल्या.

त्यानंतर माझे व पो.नि. चौधरी यांचे लाचेची रक्कम देतेवेळी होणारे संभाषण ध्वनीमुद्रीत करण्याकरीता माझे शर्टाच्या आतील बनियानला पुन्हा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावला. त्यानंतर मी व पंच श्री. कांबळे असे पो.नि. चौधरी यांना भेटण्याकरीता देवनार पोलीस ठाणेतील त्यांचे केबीनमध्ये पुन्हा गेलो असता, पो.नि. चौधरी यांनी माझे विरुध्द् दाखल असलेल्या गुन्हयात मला जामीन मिळण्यासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन देवून माझेकडे लाचेच्या रकमेची मागणी केली व पहिला हप्ता म्हणून मी सोबत नेलेल्या रु. ८०,०००/– लाचेची

रक्कम स्विकारली. त्यानंतर ठरल्याप्रमाणे मी पो.नि. चौधरी यांचे केबीनबाहेर येवून माझेकडून लाचेची रक्कम स्विकारलेबाबत इशारा म्हणून मी माझे पॅन्टच्या डाव्या खिशातील रुमाल डाव्या हाताने काढून रुमाल माझे तोंडावर वारंवार फिरविला. त्यावेळी देवनार पोलीस ठाणेच्या आजुबाजूस स्वत:चे अस्तित्व लपवून थांबलेल्या सापळा पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पळत येवून देवनार पोलीस ठाणेतील पो.नि. चौधरी यांचे केबीनमध्ये जावून त्यांना ताब्यात घेतले व लागलीच दोन पंचांसमक्ष त्यांची अंगझडती घेतली असता पो. नि. चौधरी यांनी परिधान केलेल्या पोलीस युनीफॉर्मच्या पॅन्टच्या डाव्या खिशातून, त्यांनी माझेकडून स्विकारलेली लाचेची रक्कम रु. ८०,०००/- ही स.पो.आ. पाटील यांचे सुचनेवरुन, पंच श्री. चव्हाण यांनी ताब्यात घेतली. त्यानंतर पो.नि. चौधरी यांच्या दोन्ही हातांची अल्ट्राव्हायोलेट दिव्यामध्ये पाहणी केली असता त्यांच्या दोन्ही हाताच्या बोटांना व तळव्याला फिक्कट हिरवट रंगाची चकाकी दिसून आले. तसेच युनिफॉर्मच्या पॅटच्या डाव्या खिशाला, शर्टला व त्यांच्या बसण्याच्या खुर्चीवर असलेला टॉवेल व नॅपकीनला देखील फिक्कट हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. पोलीसांनी सदर वस्तुंना व ठिकाणी दिसून आलेले हिरवट रंगाची चकाकी ही नोटांना लावलेल्या अॅन्थ्रासिन पावडरची असल्याचे समजावून सांगितले.

तरी देवनार पोलीस ठाणेचे पो.नि. दत्तात्रय चौधरी यांनी माझेविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयात मला, माझा भाऊ शंकर व दोन मित्र यांना जामीन मिळवून देण्याकरीता तसेच आमचे विरुध्दच्या दाखल गुन्हयामध्ये सहकार्य करण्याकरीता, पो.नि. चौधरी यांनी कोणत्याही कायदेशीर परिश्रमाखेरीज स्वत:करीता, माझेकडे रु. ३,००,०००/- रक्कमेच्या लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती रु. २,५०,०००/- रक्कमेची लाच स्विकारण्याचे मान्य केले व त्यातील पहिला हप्ता रु. ८०,०००/- इतक्या रक्कमेची लाच स्विकारताना त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस पथकाने रंगेहाथ पकडले आहे म्हणून माझी पो.नि. चौधरी यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे.

माझे पो.नि. दत्तात्रय चौधरी यांचेशी कोणतेही पुर्व वैमनस्य नाही तसेच त्याचेशी कोणतेही अन्य आर्थिक व्यवहार नाहीत.

माझा जबाब मराठीत टंकलिखीत केला असून तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष

(संजीव पाटील)
सहाय्यक पोलीस आयुक्त,
लचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे ..........

Reasons for delay in reporting by the complainant/informant —

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकुण मुल्य .......... —

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक : ..........

Unnatural / Accidental Death Case No., if any —

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

वा/न तारीख, वेळी व ठिकाणी यातील आलोसे यांनी फिर्यादी, त्यांचा भाऊ व मित्र यांचेविरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्यात त्यांनी घेतलेल्या अटकपूर्व जामिनामध्ये सहकार्य करण्याच्या मोबदल्यात फिर्यादी यांचेकडे रु. ३,००,०००/- इतक्या रकमेची लाचेची मागणी करून तडजोडीअंती रु. २,५०,०००/- लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले व त्या रकमेपैकी पहिला हप्ता म्हणून रोख रु. ८०,०००/- इतकी रक्कम कायदेशीर परिश्रमाखेरीज पारितोषण म्हणून स्वतःकरिता स्विकारली म्हणून गुन्हा कलम -७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम (सुधारित-२०१८) अन्वये नोंद

13. केलेली कार्यवाही :- 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :

..........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .........., जिल्हा .........., राज्य ..........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) .......... Rank.......... No. .......... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to .......... (3) Transferred to P.S .........., District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा

Signature and Thumb impression of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.

Signature of Officer In-charge, Police Station

संपूर्ण नाव Name संजीव मनोहर पाटील

पदनाम Rank सहाय्यक पोलिस आयुक्त,

तपासिक अं. चा कोड. क्र. ला.प्र.वि., मुंबई.

Posting

Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख १३/०२/२०१८

1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**